तातडीचे/अति महत्वाचे

# मुंबई विद्यापीठ

शैक्षणिक नियुक्त्या व गुणवत्ता हमी
(सांख्यिकी कक्ष),
खोली क्र. २०२, दुसरा मजला,
मुंबई विद्यापीठ, फोर्ट,
महात्मा गांधी मार्ग,
मुंबई- ४०० ०३२.

दुरध्वनी क्र. ०२२-६८३२ ००५२

Email : supt.statunit@gmail.com

**No. AAQA/ICD/2021-22/152 of 2021**

**विषय : अखिल भारतीय उच्चतर शिक्षा सर्वेक्षण कार्यक्रम (AISHE) शैक्षणिक वर्ष २०२०-२१ बाबतची ऑनलाईन माहिती भरणेबाबत. (www.aishe.gov.in)**

**संदर्भ : मा. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र शासन, पुणे यांचे क्र.उशिसं/सांख्यिकी/एआयएसएचई/२०२१-२२/१३७८९, दिनांक २६/११/२०२१ रोजीचे पत्र.**

---

परिपत्रक :-

उपरोक्त विषय व संदर्भास अनुसरून सर्व संलग्नित/मान्यताप्राप्त महाविद्यालये/संस्था यांचे प्राचार्य/संचालक तसेच समन्वयक, विश्वभूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श महाविद्यालय, अंबाडवे, ता. मंडणगड, जि. रत्नागिरी व विजयालक्ष्मी विश्वनाथ दळवी आदर्श महाविद्यालय, तळेरे, ता. कणकवली, जि. सिंधुदूर्ग, यांचे लक्ष उपरोक्त नमुद विषयाबाबतचे मा. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र शासन, पुणे, यांचेकडून प्राप्त झालेल्या संदर्भिय पत्राकडे वेधण्यात येत आहे. (प्रत संलग्न)

सदर पत्रान्वये मा. संचालकांनी असे कळविलेले आहे की, उच्च शिक्षण विभाग, शिक्षण मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली, यांनी शैक्षणिक वर्षे २०२०-२१ करीता ऑनलाईन माहिती नोंदणीचे वेब लिंक **www.aishe.gov.in** दिनांक १ डिसेंबर, २०२१ पासून उपलब्ध करून दिलेली आहे. अखिल भारतीय उच्च शिक्षण सर्वेक्षण (AISHE) कार्यक्रम हा संचालक, उच्च शिक्षण विभाग, शिक्षण मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली, निर्मित सर्वेक्षणाच्या कामकाजाबाबत आपणास विचारण्यात आलेली माहिती ही अत्यंत महत्वपुर्ण व शासनास पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी उपयुक्त असल्याने ती आपल्यामार्फत त्वरीत सादर करणे अनिवार्य आहे. त्याचबरोबर सहसंचालक कार्यालय व उच्च शिक्षण संचालनालयाचे अधिनस्त सर्व अकृषी विद्यापीठे आणि संलग्नित सर्व महाविद्यालयांनी ऑनलाईन माहिती नोंदविणे अनिवार्य आहे. माहिती नोंदणीबाबतचे व त्यानंतर नोंदविलेल्या माहितीची वैधता पडताळणी करून आवश्यक तेथे दुरूस्ती करण्याबाबतचे कामकाज सर्व सहसंचालक कार्यालये, विद्यापीठे आणि संलग्नित महाविद्यालयांनी दिनांक १५ फेब्रुवारी, २०२२ अखेर निश्चितपणे पुर्ण करावयाचे आहे. कारण विद्यापीठास संबंधित कामकाजाविषयी आढावा घेण्यास सोयीचे होईल. तसेच संबंधित शैक्षणिक वर्षाच्या माहिती नोंदणीच्या कामाचा अहवाल संचालनालयाकडून तातडीने शासनास सादर करावयाचा असल्याने उपरोल्लेखित माहिती नोंदणीचे व वैधता पडताळणी करण्याचे कामकाज तातडीने करण्याच्या सूचना संचालक महोदयांमार्फत देण्यात आलेल्या आहेत.

राज्यातील उच्च शिक्षणाबाबतचे धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी, त्याची अंमलबजावणी करण्यासाठी व सर्व महाविद्यालये/संस्था यांचे सर्वेक्षणामध्ये समावेश होण्याच्या दृष्टीकोनात विचार करता अत्यावश्यक असलेली ऑनलाईन माहिती त्यांनी दिलेल्या **www.aishe.gov.in** या वेब-पोर्टलवर नोंदविणे अत्यंत गरजेचे आहे.

**अखिल भारतीय उच्चतर शिक्षा सर्वेक्षण कार्यक्रम AISHE बाबत :-**

**शैक्षणिक वर्ष २०२०-२१ या वर्षाकरीता संचालनालयाकडून खालीलप्रमाणे विचारण्यात आलेली ऑनलाईन पद्धतीनुसार 1) College Institution Form-DCF-II (Attached to University) महाविद्यालये/संस्था यांच्याकडून मागविलेली माहिती, 2) Other Minority Form-DCF-IV- महाविद्यालये/संस्था यांच्याकडे असलेल्या अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांच्या नोंदणी बाबत व 3) Teachers Information Format- TIF शिक्षकांबाबतची माहिती ही संचालनालयामार्फत शासनास सादर करण्याच्या हेतूने व कार्यालयीन कामाची योग्य ती कार्यवाही पुर्ण करण्याच्या हेतूने ती दिनांक १५ फेब्रुवारी, २०२२ पर्यंत संचालनालयास विनाविलंब सादर करणे अत्यावश्यक आहे.**

उपरोल्लेखित सर्व बाबी लक्षात घेता, आपल्या असे निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, सर्वेक्षणाद्वारे शासनास उपलब्ध असलेली विविध शैक्षणिक बाबींची महत्वपुर्ण माहिती प्रती शैक्षणिक वर्षानुसार वेबपोर्टलवर उपलब्ध असलेल्या विवरण पत्रानुसार ऑनलाईन स्वरूपात भरणे व त्याचप्रमाणे महाविद्यालयीन शिक्का व आपल्या सहीनिशी परिपुर्ण असलेल्या प्रमाणपत्रासहीत विद्यापीठास सादर करणे अनिवार्य आहे, अन्यथा कोणतीही विद्यापीठीय कार्यालयीन कार्यवाहीची पुर्तता हमीपत्र/प्रमाणपत्राविना करता येणार नाही.



Scanned with CamScanner

# मुंबई विद्यापीठ



सर्वेक्षण कार्यक्रमाच्या माध्यमातून ऑनलाईन स्वरूपातील माहिती विवरण पत्रामध्ये भरण्याबाबत आपणास काही समस्या/अडचणी उद्भवल्यास खालील दिलेल्या रकान्यातील अधिकारी/कर्मचारी यांच्याशी संपर्क साधावा.

| Contact Person | Office | Land Line No. | E-mail ID |
|---|---|---|---|
| Nodal Officer (AISHE/MIS Cell) | Academic Appointments & Quality Assurance, Room No. 202, Fort, Mumbai- 400 032. | Landline : 022-6832 0052<br>Mobile : 77150 26409<br>96194 65076 | supt.statunit@gmail.com |

टिप्पणी : १. AISHE व Students on Roll ऑनलाईन माहिती ज्या संबंधित व्यक्तीने भरलेली असल्यास त्यांनी त्या माहिती विषयी पडताळणी करून घेणे व त्यानंरचे एकत्रित स्वरूपातील असलेले सदरचे हमीपत्र/प्रमाणपत्र दिनांक १५ फेब्रुवारी, २०२२ पर्यंत किंवा शक्य असल्यास त्या अगोदर घेणे अनिवार्य आहे.

२. सर्व स्तरातील AISHE, MIS व Students on Roll ऑनलाईन माहिती भरताना विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर संख्येबाबतच्या माहितीमध्ये कोणतीही तफावत नसावी, ती अचूक असावी, याची नोंद घ्यावी.

३. ज्या महाविद्यालयांनी शैक्षणिक वर्षे २०२०-२१ व २०२१-२२ करीता AISHE, MIS व Students on Roll वेबपोर्टलवर नोंदणी (Registration) करून घेतलेली नसल्यास संबंधित विभागास त्वरीत संपर्क साधावा.

मुंबई - ४०० ०३२
दिनांक : २९ नोव्हेंबर, २०२१

(सुधीर श. पुराणिक)
कुलसचिव

---

प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीकरीता रवाना:-

(अ) प्रत माहिती करीता सविनय सादर :-

१. मा. संचालक, शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण), मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१.
२. मा. सहसंचालक, (उच्च शिक्षण), मुंबई विभाग, ३ महापालिका मार्ग, मुंबई-४००००१
३. मा. सहसंचालक, (उच्च शिक्षण), कोकण विभाग, पनवेल, जि. रायगड -४१०२०६

(ब) प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीकरीता :-

१. संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ, परीक्षा विभाग, मुंबई विद्यापीठ, विद्यानगरी, सांताक्रुझ (पूर्व), मुंबई-४०००९८.
२. उपकुलसचिव, संलग्नता विभाग, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई-४०००३२.
३. उपकुलसचिव, घटक महाविद्यालये, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई-४०००३२.
४. उपकुलसचिव, पदव्युत्तर विभाग, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई-४०००३२.
५. उपकुलसचिव, विशेष कक्ष, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई-४०००३२.
६. उपकुलसचिव, पात्रता/नाव नोंदणी विभाग, मुंबई विद्यापीठ, विद्यानगरी, सांताक्रुझ (पूर्व), मुंबई-४०००९८.
७. उपकुलसचिव, रत्नागिरी उपकेंद्र, पी-६१, MIDC, मिरजोळे, रत्नागिरी - ४१५६३९.
९. सहायक कुलसचिव, शिक्षक नियुक्ती विभाग, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई-४०००३२
१०. सहायक कुलसचिव, ठाणे उपकेंद्र, मुंबई विद्यापीठ, ठाणे-४०० ६०८.
११. सहायक कुलसचिव, कल्याण उपकेंद्र, मुंबई विद्यापीठ, कल्याण.
१२. अधिक्षक, आवक विभाग, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई-४०००३२.
१३. अधिक्षक, आवक विभाग, मुंबई विद्यापीठ, विद्यानगरी, सांताक्रुझ (पूर्व), मुंबई-४०००३२.

आपणांस कळविण्यात येते की, AISHE, MIS व Students on Roll बाबतची माहिती विद्यापीठ विभाग व संलग्न महाविद्यालये/संस्था यांनी भरणे अनिर्वाय असून ती न भरल्यास विद्यापीठ विभाग व महाविद्यालय/संस्था यांच्या विद्यार्थ्यांचे नोंदणी/पात्रता अर्ज (Enrollment/EligibilityForm), महाविद्यालयाची संलग्नता (Continuation/Extension)/प्राचार्य/ शिक्षकमान्यता (Approval) परिक्षा अर्ज (Exam.Form) व महाविद्यालये/संस्थांचे कोणतेही पत्रव्यवहार स्विकारू नयेत. तसेच जाहिरात, मसुदा, बिदुंनामावली तपासणी करू नयेत. त्याचप्रमाणे प्रत्येक विद्यापीठ विभाग/संलग्न महाविद्यालये/संस्थेकडून त्याबाबतच्या प्रमाणपत्राची छायांकित प्रत संबंधितांकडून घेण्यात यावी व त्यानंतरच पुढील योग्य ती कार्यालयीन कार्यवाही करण्यात यावी, असे आदेश मा. संचालक, संचालनालय, उच्च शिक्षण विभाग, पुणे व मा. कुलगुरू, मुंबई विद्यापीठ, यांनी दिलेले आहेत, याची आपण प्रमुख या नात्याने गांभीर्याने नोंद घ्यावी.

(सुधीर श. पुराणिक)
कुलसचिव

Scanned with CamScanner

# शैक्षणिक नियुक्त्या व गुणवत्ता हमी (सांख्यिकी कक्ष)

## AISHE & Students on Roll

## प्रमाणपत्र/हमीपत्र

## शैक्षणिक वर्ष - २०२०-२१

दिनांक :

असे प्रमाणित करण्यात येते की, आपण दिलेल्या प्र-पत्राच्या वहित नमुन्याप्रमाणे संकलित केलेली माहिती रकान्यानुसार खालीलप्रमाणे :-

| अ. क्र. | विषय व संकेतस्थळ | परिपत्रक क्रमांक | माहिती भरली आहे / नाही | शेरा |
|---|---|---|---|---|
| १. | विद्यार्थी संख्या माहिती (Students on Roll) शै. व. २०२०-२१ www.eoffice.mu.ac.in/statistical | No. UDSTAT/ICD/2020-21/ 24 of 2020, dated 13th October 2020 | | रकान्यात नमूद केलेले सर्व संबंधित ऑनलाईन माहिती विषयीची शै. व. २०१६-१७ ते २०१९-२० बाबतचे सदर कक्षाकडून प्राप्त झालेले प्रमाणपत्र/ हमीपत्राची प्रत सोबत पडताळणीसाठी घेऊन येणे अनिवार्य आहे. |
| २. | अखिल भारतीय उच्च शिक्षण संस्था (AISHE) शै. व. २०२०-२१ www.aishe.gov.in | No. AAQA/ICD/2021-22/152 of 2021, dated 29 November, 2021 | | |
| ३. | व्यवस्थापकीय माहिती पद्धत शै. व. २०२०-२१ (MIS) dhemis.maharashtra.gov.in | No.UDSTAT/ICD/MIS/2020-21/ 56 of 2021, dated 1st January, 2021 | शै. व. २०२०-२१ या वर्षासाठी घेतलेल्या प्रमाणपत्राची एक छायांकित प्रत सोबत पडताळणीसाठी घेऊन येणे अनिवार्य आहे. | |

उपरोक्त रकान्यानुसार दर्शविल्याप्रमाणे पोर्टलवर भरलेली अत्यावश्यक ऑनलाईन माहिती परीपूर्ण व अचूक आहे. संबंधित माहितीमध्ये काही त्रुटी आढळल्यास महाविद्यालयाचा/संस्थेचा प्राचार्य/संचालक या नात्याने मी सर्वस्वी जबाबदार राहील, याची मी ग्वाही देतो/देते.

Contact :- ____________

Email Address :-____________________________

प्राचार्य/संचालक

(नाव, सही व शिक्का)

...........................................................................................................

## कार्यालयीन कामकाजाकरीता

महाविद्यालय/संस्था यांची AISHE, MIS व Students on Roll शैक्षणिक वर्ष २०२०-२१ या वर्षाची माहिती शैक्षणिक नियुक्त्या व गुणवत्ता हमी विभागाकडे प्राप्त झालेली असून सदर महाविद्यालय/संस्था यांचे परीक्षा अर्ज/नोंदणी अर्ज व महाविद्यालय/संस्था यांची संलग्नता (Continuation/Extension)/प्राचार्य/शिक्षक मान्यता (Approval) स्विकारण्यास तसेच जाहिरात मुसदा व बिंदूनामावली तपासण्यास हरकत नाही.

नोडल अधिकारी,

(AISHE/MIS Cell)

Scanned with CamScanner